पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २२१**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - २६/०४/२०१६ वेळ - दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २६/०४/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.सौ. साळुंके सविता सुरेश
३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
५) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६) मा.काळे विमल रमेश
७) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
९) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१०)मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
११)मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१२)मा.नेटके सुमन राजेंद्र
१३)मा.लोंढे शुभांगी संतोष
१४)मा.वाबळे संजय मल्हारराव
१५)मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.देशमुख-वैद्यकीय अधिक्षक, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडुसकर, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.शेख, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.बोदडे, मा. बेंडे-प्रशासन अधिकारी, मा.वाघमारे-मुख्य अभियंता-पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -</u>**

विषय क्र.२२) वॉर्ड क्र.३५ मधील जुनी भाजी मंडई पाडून दुमजली भाजी मंडई इमारत बांधणेकामी मे. पेव्हटेक कन्सलटंट्स पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणेस व फी अदायगीस मान्यता देणेबाबत - मा. अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२३) मे.अनिरुध्द वैद्य अँड असोसिएट्स यांची आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणुक करणेबाबत- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) प्र.क्र.४० मधील एच.ए.कॉलनीतील विकास कामांना आर्थीक तरतूद मंजूर करणेबाबत- मा.अमिना पानसरे व मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२५) रावेत केंद्राचे टप्पा क्र.१ ते ४ अंतर्गत नदी जल उपसा करारनाम्याचे नुतनीकरण करणेबाबत.

विषय क्र.२६) उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर २०१६ चे आयोजन धर्मवीर संभाजी राजे क्रीडा संकुल, यमुनानगर येथील मैदानावर करणेबाबत.

विषय क्र.२७) वॉर्ड क्र.३५ भोसरी नं.१ मध्ये आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र इमारत बांधणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणेस व फी अदायगीस मान्यता देणेबाबत

विषय क्र.२८) लांडेवाडी झोपडपट्टीमधील अंतर्गत गल्लीबोळाचे कॉक्रीटीकरण करणबाबत- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) नागसेननगर झोपडपट्टीमधील स्थापत्य विषयक कामे करणे- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधील गटाराची दुरूस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३१) शांतीनगर झोपडपट्टीमधील अतंर्गत गल्लीबोळाचे कॉक्रिटीकरण करणे- मा.अमिना पानसरे व मा. वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १६०३२ दि. २०/४/२०१६ दुरूस्तीबाबत- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करणे-मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) वास्तुविशारद **(Architect)** व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार **(PMC)** नेमणे व फी अदा करणेबाबत- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) माजी महापौर कै.भिकू वाघेरे (पाटील) ५६ वी महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

----------

दिनांक २०/०४/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.२२०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक -१६०७४ विषय क्रमांक - १
दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- भुमि आणि जिंदगी
सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/२/कावि/६२/२०१६ दि.२६/०२/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुकाई चौक रावेत स.नं. ७७ ते ७९ brts बस टर्मिनल मधील व्यापारी गाळा क्र.१ ते ६ मिळकत लिजने ३० वर्ष कालावधीसाठी वितरणाकामी इच्छुक नागरीकाकडून ई -निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६ अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

१) कामाचे नाव - मुकाई चौक रावेत स.न.७७ ते ७९ brts बस टर्मिनल मधील व्यापारी गाळा क्र.१ ते ७ .२) मनपा दर र.रू. गाळा क्र.१,२,६ व ७ प्रत्येकी. ४,५४,७९६/- गाळा क्र.३ र.रु.४,२३,६४१/- गाळा क्र.४ र.रु. ४,८१,२६१/- गाळा क्र.५ र.रु. ७,३५,१९१/- गाळा क्र.७ र.रु.४,५४,७९६/-.३) ई- निविदा क्र.निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६. ४) गाळा क्षेत्र — गाळा क्र. क्र.१,२,६व ७ प्रत्येकी ६७.८८ चौ.फु. गाळा क्र.३चे ६३.२३ चौ.फु., गाळा क्र.४ चे ७१.८३ चौ.फु., गाळा क्र.५चे १०९.७३ चौ.फु.५) बयाणा रक्कम रुपये— गाळा क्र. क्र.१,२,६ व ७ प्रत्येकी र.रु.४,५४८/- गाळा क्र.३ चे र.रु. ४,२३६/- गाळा क्र.४ चे र.रु.४,८१३/- गाळा क्र.५ चे र.रु.७,३५२/- ६) लिज कालावधी - ३० वर्ष, ७) ई-निविदा प्रसिध्द दि. ०८/१२/२०१५ ते दि.०७/०१/२०१६. ८) ई-निविदा प्रसिध्दी—दै.केसरी, दै.बंधूप्रेम, दै.दायित्व, सा.पुष्पप्रकाश, सा.आशाकिरण वार्ता. १०)निविदा उघडल्याचा दि. पाकीट क्र.१ दि. १५/०१/२०१६, पाकीट क्र.२ दि. ०६/०२/२०१६. ११) पात्र प्राप्त निविदा संख्या- गाळा क्र.१-.४, गाळा क्र.२-.४, गाळा क्र.३-.३, गाळा क्र.४-४. गाळा क्र.५-.३ गाळा क्र.६-.४ एकुण ६ गाळे निविदा प्राप्त. प्रस्तुत कामासाठी वरील प्रमाणे निविदा प्राप्त असुन निविदा धारकानी दरपत्रक सादर केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | गाळा क्र.व क्षेत्र | निविदाधारक नाव | मनपाचा दर | प्राप्त दर | कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १<br>६७.८८चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराट्र बेरोजगार संघ | ४,५४,७९६/- | ४,६०,२५०/-<br>४,५४,८११/-<br>४,५४,९१२/-<br>४,५५,२९८/- | ३० वर्ष | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | २<br>६७.८८<br>चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराटू बेरोजगार संघ | ४,५४,७९६/- | ४,६०,२५४/-<br>४,५४,८८८/-<br>४,५४,९९९/-<br>४,५५,३२५/- | ३० वर्ष | |
| ३) | ३<br>६३.२३<br>चौ.फु. | १)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>२)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)नवमहाराटू बेरोजगार संघ | ४,२३,६४१/- | ४,२३,७५०/-<br>४,२३,७९९/-<br>४,२४,१३०/- | ३० वर्ष | |
| ४) | ४<br>७१.८३<br>चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराटू बेरोजगार संघ | ४,८१,२६१/- | ४,८६,७१५/-<br>४,८२,१११/-<br>४,८२,५६६/-<br>४,८२,५५५/- | ३० वर्ष | |
| ५) | ५<br>१०९.७३<br>चौ.फु. | १)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराटू बेरोजगार संघ | ७,३५,१९१/- | ७,३५,३३३/-<br>७,३५,९९९/-<br>७,३५,५५५/- | ३० वर्ष | |
| ६) | ६<br>६७.८८<br>चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यंकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३) एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४) नवमहाराष्ट्र बेरोजगार संघ | ४,५४,७९६/- | ४,६०,२४५/-<br>४,५४,८८८/-<br>४,५५,१११/-<br>४,५४,९९०/- | ३० वर्ष | |

वरील प्रमाणे सदर गाळयाकरीता मनपा दर व मनपा दराचे तुलनेने सर्वात जास्त व प्राप्त दर आहेत. यामधील सर्वोच्च दर हा १) गाळा क्र.१ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५०/- २) गाळा क्र.२ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५४/- ३) गाळा क्र.३ नवमहाराटू बेरोजगार संघ यांचा रक्कम रुपये ४,२४,१३०/- ४) गाळा क्र.४ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,८६,७१५/- ५) गाळा क्र.५ एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचा रक्कम रुपये ७,३५,९९९/- ६) गाळा क्र.६ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा

रक्कम रुपये ४,६०,२४५/- आहे. यांची रक्कम ही शासन व मनपा करा व्यतिरिक्त या दराने प्राप्त झालेली आहे. प्रस्तुतकामी १) गाळा क्र.१ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५०/- २) गाळा क्र.२ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५४/- ३) गाळा क्र.३ नवमहाराट्र बेरोजगार संघ यांचा रक्कम रुपये ४,२४,१३०/- ४)गाळा क्र.४ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,८६,७१५/- ५) गाळा क्र.५ एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचा रक्कम रुपये ७,३५,९९९/- ६) गाळा क्र.६ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२४५/- आहे. या दराने आलेली निविदा मनपा दरापेक्षा व इतर निविदाधारकांचे तुलनेने सर्वात जास्त दराची असलेने ३० वर्ष लिज कालावधीने स्विकृत करणेस व करारनामा करुन लिजने देणेस मान्यता देणेकामी मा. महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०७५ विषय क्रमांक - २
दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- विद्युत मुख्य कार्यालय
सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१८७/२०१६ दि.२२/०३/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.२५/२०१५/२०१६ मधील अ.क्र.१ अन्वये मनपाचे प्रभाग क्र.३३ मधील सखुबाई गबाजी गवळी उद्यान येथे आकर्षक विद्युत कारंजे करणे कामी मे.प्रिमियर वर्ल्ड टेकनॉलॉजिस लि.स (नि.र.रू. १,७९,६८,१२८/- (अक्षरी र.रु. एक कोटी एकोणऐंशी लाख अडूसष्ठ हजार एकशे अठ्ठावीस फक्त) पेक्षा ८.८०% जादा या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०७६ विषय क्रमांक - ३
दिनांक -२६/०४/२०१६ विभाग- आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक -मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२३२/२०१६ दि.०४/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील एकूण ४१ पैकी प्रस्तावात नमूद ३३ स्मशानभूमी/दफनभूमी वगळता उर्वरीत ८ स्मशानभूमी/दफनभूमीत काळजी वाहक पुरविणेची मुदत १९/०५/२०१६ रोजी संपणार आहे. नविन निविदा कार्यवाही करावयाची असल्याने सर्व स्मशानभूमी/दफनभुमीच्या मुदतीत/ कालावधीत एकसारखेपणा असणे आवश्यक असल्याने, उर्वरीत ४० संस्थाना मा.आयुक्त सो. यांनी दि. ३१/०५/२०१६ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार एकूण ४० संस्थांची मुदतवाढ कालावधीकरीता ठेकेदार म्हणून नेमणूक करणे,

त्यांचेशी आवश्यक अटी/शर्तींचा करारनामा करणे कामाचे आदेश देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.३६,६८,३९१/- अथवा प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०७७ विषय क्रमांक - ४

दिनांक -२६/०४/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.संजय वाबळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२२६/१६ दि.७/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४३/७/१५-१६ प्रभाग क्र.४६ काळेवाडी स्मशान भुमीसाठी दशक्रिय विधी, पिंडदान विधी इत्यादी करीता स्थापत्य विषय कामे करणे, घाट विकसित करणे व सुशोभिकरण करणेकामी मे.शिवकुमार कन्स्ट्रक्शन नि.र.रु.६७,२२,५६०/- (अक्षरी र.रु. सदुसष्ठ् लाख बावीस हजार पाचशे साठ फक्त) पेक्षा ३.५१% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६८,१०,९२८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०७८ विषय क्रमांक - ५

दिनांक -२६/०४/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक -मा.संजय वाबळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/२९४/२०१६ दि.११/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरोग्य विभागासाठी विविध प्रकारचे साफ सफाई साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्र.४२/२०१५-१६ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले होते. त्यामध्ये मे.कापसे एंटरप्रायजेस यांचे ४ बाबी साफ सफाई साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.२,४१,३५४/- मे.रेखा इंजि.वर्क्स यांचे ११ बाबी साफ सफाई साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.१०,५८,७८०/- मे.स्टार फब्रीक्स यांचे १ बाब साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.५२,९९७/- मे. स्पेक्ट्रम एंटरप्रायजेस यांचे ४ बाबी साफ सफाई साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.४,१३,१००/- मे. भारती एंटरप्रायजेस यांचे १२ बाबी साफ सफाई साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.३,२६,८३६/- मे.साईराज एंटरप्रायजेस यांचे ४ बाबी साफसफाई साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.५५,१४०/- व मे.डी.के.दोडके एंटरप्रायजेस यांचे १ बाबीचे लघुत्तम दर एकूण र.रू.१,७०,०००/- प्राप्त झालेले आहेत. एकत्रीत प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास ३६ प्रकारचे साफ सफाई साहित्य खरेदी कामी एकूण र.रू. २३,१८,२०७/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर

एकूण र.रू.३४,२०,८७७/- पेक्षा ३२.२३% ने कमी आहेत. सदर दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०७९ विषय क्रमांक - ६
दिनांक -२६/०४/२०१६ विभाग- मुख्य लेखापरिक्षण
सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक -मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६१/२०१६ दि.१२/०४/२०१६

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२८.०३.२०१६ ते दि.०३.०४.२०१६ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/६१/२०१६ दि.१२.०४.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८० विषय क्रमांक - ७
दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- मुख्य लेखापरिक्षण
सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक -मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६०/२०१६ दि.१२/०४/२०१६

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१.०३.२०१६ ते दि.२७.०३.२०१६ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/६०/२०१६ दि.१२.०४.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८१ विषय क्रमांक - ८
दिनांक -२६/०४/२०१६ विभाग- विद्युत मुख्य कार्यालय
सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक -मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता (वि/यां)यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/८/२०१६ दि.१८/४/२०१६

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.23/2015-2016 मधील अ.क्र.6 अन्वये ड प्रभाग अंतर्गत वाकड व पिंपरी उपविभागातील विविध ठिकाणच्या नविन व जुन्या स्मशानभूमी / घाटांवर विद्युत व्यवस्था करणेकामी मे.आर.एन.एंटरप्रायजेस नि.र.रू.4,22,268/- [अक्षरी र.रू.

चार लाख बावीस हजार दोनशे अडूसष्ट फक्त] पेक्षा 30.50% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८२ विषय क्रमांक - ९

दिनांक -२६/०४/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक -मा.सुमन नेटके अनुमोदक -मा.संजय वाबळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/६/२०१६ दि.२०/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/४९/०२/२०१५-१६ मधील पिंपरी स्वप्ननगरी मधील बेघरांसाठी घरे बांधणेसाठी आरक्षण क्र.७७ व ७९ या आरक्षित जागेला सिमाभिंत बांधणे. मे. पाडूरंग एन्टरप्रायजेंस नि.र.रु. ३४,१७,५८३/- (अक्षरी र.रु. चौतीस लाख सतरा हजार पाचशे त्र्याऐंशी फक्त) पेक्षा ४०.०१% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२१५२७१८/- पर्यंत काम करून घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८३ विषय क्रमांक - १०

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:- मा.समीर मासुळकर व मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव-

क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र. ५६ दि.११/०४/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कुस्तीगीर संघ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद पुणे यांच्या मान्यतेने व सहकार्याने माहे एप्रिल/मे २०१६ या काळात नवमहाराष्ट्र विद्यालय मैदान, पिंपरी वाघेरे येथे सन २०१५-१६ मध्ये मंजूर केलेली महापौर चषक राज्यस्तर कुस्ती स्पर्धा २०१६-१७ मध्ये आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३५,००,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र.७९७ दि.२५/०१/२०१६ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/११८/२०१६, दि.२१/०३/२०१६ अन्वये सदर स्पर्धेस मा.ज्ञानेश्वर पांडुरंग लांडगे महापौर चषक राज्यस्तर कुस्ती स्पर्धा २०१६-१७ असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८४ विषय क्रमांक - ११

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/४ड/कावि/२४१/२०१६ दि.२०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र. ६ मोशी येथील गावठाणातील जुना संडास ब्लॉक (१० सिटस) पाडुन त्या ठिकाणी १० सिटस संडास ब्लॉक "पैसे द्या व वापरा" तत्वावर संडास ब्लॉक बांधणे हे काम मे. सुलभ इंटरनशनल या संस्थेकडुन करारनामा करुन काम थेट पध्दतीने करणे व त्यास येणा-या खर्चास अंदाजपत्रकीय र.रु.३६,२६,३८३/- व त्यावर कार्यवाही भार शुल्क १७.५०% या प्रमाणे करारनामा करुन घेऊन काम थेट पध्दतीने देणे तसेच सदर कामासाठी वर्क ऑर्डर सोबत ३०% अडव्हान्स व प्लिंथ लेवल पर्यंत काम झालेनंतर दुसरा ३०% अडव्हान्स आर सी सी व वीट काम पुर्ण झालेनंतर ३०% रक्कम व उर्वरित १०% रक्कम काम पुर्ण झालेवर देणेस व त्यासाठी येणा-या एकुण र.रु.४२,६१,०००/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८५ विषय क्रमांक - १२

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२४३/१६ दि.२०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५३/१०/१५-१६ प्रभाग क्र.५६ वैदूवस्ती जवळकरनगर येथील खेळाचे मैदानामधील उर्वरीत कामे करणेकामी मे. सोहम एंटरप्रायजेस नि.र.रु. ४२,८७,११५/- (अक्षरी र.रु. बेचाळीस लाख सत्याऐंशी हजार एकशे पंधरा फक्त) पेक्षा ४३.११% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२५,६०,८८७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८६ विषय क्रमांक - १३

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- माध्यमिक शिक्षण

सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/३६/१६ दि.२०/४/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अधिनस्त असलेल्या १८ माध्यमिक विद्यालयातील ८ वी ते १० वी तील विद्यार्थ्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख अगदी सहज व सोप्या स्वरुपात होणेसाठी अंशुल प्रकाशन यांनी बाबासाहेब नावाच्या पॉकेट ग्रंथांची निर्मिती केली आहे. २० रुपये अशी किंमत असलेला हा पॉकेट ग्रंथ सवलतीत १० रुपयांत उपलब्ध करुन देणेबाबत दिनांक २९/१/१६ अन्वये अंशुल प्रकाशन यांनी कळविले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांस १ पुस्तक याप्रमाणे ८२५९ विद्यार्थ्यास र.रु.१० प्रमाणे ८२,५९०/- इतका खर्च येईल. खरेदी थेट पध्दतीने निविदा न मागविता, करारनामा न करता खरेदी कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचा खर्च माध्यमिक शिक्षण विभागाकडील "विविध उपक्रम" या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८७ विषय क्रमांक - १४
दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- वायसीएमएच
सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/३२३/२०१६ दि.१८/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन **ए.एन.एम. हे पद** भरणेस व सदर पदाला प्रस्तावात नमूद अनुभवानुसार मानधन अदा करणेस व जर आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास पुढील ६ महिने सदर पदासाठी Walk in interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८८ विषय क्रमांक - १५
दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- वायसीएमएच
सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/३२०/२०१६ दि.१८/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील एकत्रित मानधनावर २ महिन्यासाठी स्टाफनर्स (ANM) या पदांना प्रस्तावासोबत जोडलेल्या नमूद प्रपत्र अ मधील कर्मचा-यांना मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०८९ विषय क्रमांक - १६

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- वायसीएमएच

सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/३२५/२०१६
दि.१८/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील रक्त पेढी विभागातील आवश्यक असणारी प्रस्तावात नमूद प्रपत्र "अ" नुसार विविध पदे दरमहा एकत्रीत मानधनावर ६ महिन्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भरणेस व सदर पदांना प्रस्तावात नमूद प्रपत्र "ब" व "क" नुसार मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९० विषय क्रमांक - १७

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- मुख्य लेखापरिक्षण

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५४७/२०१६ दि.२१/४/२०१६

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९१ विषय क्रमांक - १८

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/४०/१६ दि.२०/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.8/50/2015-16 प्र.क्र.41 गांधीनगर येथील डाल्को कंपनीकडे जाणा-या रस्त्याच्या कडेने फुटपाथ करणेकामी मे.सुजल कन्स्ट्रक्शन नि.र.रु. 11,49,539/- (अक्षरी र.रु. अकरा लाख एकोणपन्नास हजार पाचशे एकोणचाळीस फक्त) पेक्षा 30.04% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. 8,44,428/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची

रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९२ विषय क्रमांक - १९

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/४५८/१६ दि.१२/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.61/11/2015-16 प्र.क्र.4 मधील पेव्हींग ब्लॉक रस्त्यांची दुरूस्ती करणेकामी मे.नंदेश्वरी कॉन्ट्रक्टर नि.र.रु.17,99,957/- (अक्षरी र.रु. सतरा लाख नव्व्यान्नव हजार नऊशे सत्तावन्न फक्त) पेक्षा 47.99% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.9,82,966/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घटदरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९३ विषय क्रमांक - २०

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- प्रशासन

सुचक -मा.अनिता तापकीर अनुमोदक -मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१७/९३३/२०१६ दि.२०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासन निर्णयानुसार महापालिकेतील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांना मोटरकार खरेदीसाठी वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा र.रू. १,८०,०००/- किंवा नवीन मोटरकारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अग्रीम दिले जाते. त्याचे मुद्दलाची वसुली समान १०० हप्ते व त्यानंतर व्याज वसुली समान ६० मासिक हप्त्यामध्ये करण्यात येते. मा. स्थायी समिती ठराव क्र. ११७७ दि. १८/०९/२०१२ व मा. महापालिका सभा ठराव क्र.-१३८ दि.२६/११/२०१२ अन्वये मोटारकार खरेदीचे अग्रिम मंजुरीकामी खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील दिनांक १७ फेब्रुवारी २०१२ चे शासन निर्णयानुसार नवीन मोटरकार खरेदीसाठी ज्या अधिका-यांचे सुधारित वेतन बँड मधील मासिक वेतन रू.१९,५३०/- (ग्रेड वेतन वगळून) किंवा अधिक आहे अशा राजपत्रित अधिकारी यांना अग्रीमाची रक्कम त्यांचे वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या १७ पट किंवा ३,५०,०००/- किंवा नवीन मोटरकारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अग्रीम देय राहील. तसेच

प्रथमत: मुद्दलाची वसुली १०० समान मासिक हप्त्यात तसेच व्याज वसुली पुढे समान ६० मासिक हप्त्यात करावी. जुनी मोटरकार खरेदी करण्यासाठी अग्रीमाची रक्कम अधिका-याच्या वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा रु. १,७५,०००/- किंवा जुन्या मोटर कारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. त्याची वसूली प्रथमत: ५० समान मासिक हप्त्यात व व्याज वसुली पुढे समान ३० मासिक हप्त्यात करावी. खरेदी करावयाची जुनी मोटरकार ५ वर्षापेक्षा जुनी नसावी. तसेच नवीन व जुनी मोटारकार खरेदी करणेसाठी सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ५ वर्ष सलगसेवा झालेल्या अधिका-यांना शासकीय सेवेच्या कालवधीत एकदाच अग्रीम अनुज्ञेय राहील. उपरोक्त मा. स्थायी समिती ठराव व मा.महापालिका ठरावामध्ये नमुद असलेल्या **राजपत्रित अधिकारी** ऐवजी **मनपा मधील वर्ग १ व २ चे अधिकारी** यांना मोटारकार खरेदी अग्रिम मंजुरीबाबतची दुरुस्ती करुन सदर अग्रिमबाबतच्या इतर अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच कायम राहतील अशी दुरुस्ती होणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९४ विषय क्रमांक - २१

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- ड क्षेत्रीय कार्यालय

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/२५५/२०१६ दि.२१/३/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६-८/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्र.४७ काळेवाडी येथील मुख्य व अंतर्गत रस्त्यावरील खड्डयांची हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्तीची कामे करणेकामी ठेकेदार मे.क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि नि.र.रु. ८,३९,४५९/- (अक्षरी र.रु आठ लाख एकोणचाळीस हजार चारशे एकोणसाठ फक्त) पेक्षा -०४.५०% कमी या मंजूर दराने र.रु ८,०१,६८३/- पर्यंत ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस, तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आलेला असुन कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले</u> -**

ठराव क्रमांक -१६०९५ विषय क्रमांक - २२

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा. वैशाली जवळकर

संदर्भ :- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

वॉर्ड क्र.३५ मधील जुनी भाजी मंडई पाडून दुमजली भाजी मंडई इमारत बांधणे प्रकल्प हा वैशिष्टपुर्ण असून पिंपरी चिंचवड शहरातून भोसरी परिसरातील नागरीकांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. सदर प्रकल्पाचे काम तांत्रिकदृष्टया आराखडयाप्रमाणे करुन घेणे, कामावर देखरेख करणे, त्यांचे मोजमापे घेऊन देयक तयार करणे, विविध कामासाठी विविध खात्यांच्या समन्वय बैठका घेणे इ. कामे चोखपणे होणे आवश्यक आहे. प्रकल्पाची वरील दैनंदिन कामे परिणामकारक होणेकरिता सदर प्रकल्पासाठी निविदा पश्चात कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार असणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबीचा विचार करता विषयांकित प्रकल्प यशस्वपणे व तांत्रिक दृष्टया पुर्ण होणेकामी निविदा पश्चात कामासाठी मे. पेव्हटेक कन्सलटंट्स पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमून त्यांना प्रकल्प किंमतीच्या १.३५% फी + सेवाकर या दराने फी अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९६ विषय क्रमांक - २३

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मे. अनिरुध्द वैद्य ॲंड असोसिएट्स यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणुक करणेस व त्यांना आर्किटेक्ट विषयक कामे व त्यास्वरूपाची इतर कामे देण्यास व त्याकामी होणारी फी आर्किटेक्ट कैन्सिलचे नियमानुसार व मनपा ठरवेल त्याप्रमाणे अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९७ विषय क्रमांक - २४

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.नारायण बहिरवाडे

संदर्भः-मा.अमिना पानसरे व मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव-

प्रभाग क्र.४० मधील एच.ए. कॉलनीतील सध्या कंपनीची परिस्थीती हलाखीची असल्यामुळे केलेल्या खर्चाचा परत फेडीच्या कंपनीच्या विनंती पत्रानुसार खालील कामे करण्यामागे लागणारी आर्थिक तरतूद-

१) ड्रेनेज लाईन जॉईन करणे व रिपेअर करणे.
२) पाण्याची पाईपलाईन दुरूस्त व नविन बसविणे.
३) रस्त्याचे डांबरीकरण करणे.
४) स्ट्रीट लाईट बसविणे व दुरूस्ती करणे स्ट्रीट लाईट महापालिकेचे लाईनला जोडणे.
५) बगीचे आहेत ते दुरूस्त व इतर कामे
६) डॉ.बाबासाहेबांच्या पुतळ्यास मेघडंबरी बसविणे व ध्यान ध्यासासाठी हॉल बांधणे.
७) फुटपाथ व पेव्हिंग ब्लॉक बसविणे ह्या सर्व कामांसाठी येणारी कमीत कमी एक कोटी पन्नास लाखाची तरतूद परतफेडीच्या कंपनीच्या लेखी मागणीनुसार मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९८ विषय क्रमांक - २५
दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- जलशुध्दीकरण केंद्र
सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/२/१०४/१०१६ दि.२१/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पा.चे पाणीपुरवठा योजना टप्पा क्र. १ ते ४ योजनेअंतर्गत दि.०१.११.२०१५ ते ३१.१०.२०२१ या एकूण ०६ वर्ष कालावधीकरिता मंजूर कोटा वार्षिक १३७.०९४ द.ल.घ.मि.प्रमाणे करारनामा करणेबाबत पाटबंधारे विभागाने पत्र क्र. ताथवडे शाखा/बिसिं/४१/सन २०१६ दि. २८.०३.२०१६ अन्वये कळविले आहे. सदर करारनामा नुतणीकरण करणेकरिता सुरक्षा ठेव बँक गॅरंटी स्वरुपात र.रु. २,५४,३७,६९६ /- (अक्षरी र.रु. दोन कोटी चोपण्ण लाख सदोतीस हजार सहाशे शहाण्णव फक्त) आणि सिंचन पुर्नस्थापना खर्च र.रु. १२,८८,३१४ /- ( अक्षरी र.रु. बारा लाख अठ्याऐंशी हजार तिनशे चौदा फक्त) पाटबंधारे विभागास अदा करणेबाबत कळविले आहे. सदर रक्कम शासन नियमाप्रमाणे अदा करणे क्रमप्राप्त आहे. म.न.पा.ने दि. ०१.११.२००९ ते ३१.१०.२०१५ या कालावधीकरिता करारनाम्याकरिता र.रु. २,५४,३७,६९६ /- सुरक्षा ठेव बँक ऑफ बडोदा कडील बँक गॅरंटी स्वरुपात पाटबंधारे विभागाकडे जमा करणेत आली आहे सबब दि.०१.११.२०१५ ते ३१.१०.२०२१ कालावधीकरिता करारनामा नुतणीकरण करणेकरिता सदर बँक गॅरंटीचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे त्याकरिता येणारे आवश्यक प्रशासकीय शुल्क बँक ऑफ बडोदा यांस अदा करणे आवश्यक असल्याने सदरचा खर्च शुध्द अशुध्द जलउपसा केंद्राचे महसुली खर्च लेखाशिर्षाचे तरतूदीमधून टाकणेत येईल. पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवा विचारात घेता करारनामा नुतणीकरण करणेकरिता सिंचन पुर्नस्थापना खर्च र.रु. १२,८८,३१४ /- ( अक्षरी

र.रु. बारा लाख अठ्याऐंशी हजार तिनशे चौदा फक्त) मा.कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांस अदा करणेकामी तसेच बँक गॅरंटीचा कालावधी वाढविणेकरिता येणारे आवश्यक प्रशासकीय शुल्क बँक ऑफ बडोदा यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६०९९ विषय क्रमांक - २६

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- क्रीडा

सुचक - मा.अमिना पानसरे अनुमोदक - मा.वैशाली काळभोर

संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क. क्रीडा/को-०९/कावि/११५/२०१६ दि.२१/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर २०१६ चे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुल, यमुनानगर येथील मैदानावर करणेस व त्याकामी विविध क्रीडा साहित्य खरेदीकामी र.रू.८६,१४२/-(अक्षरी र.रू.शहाऐंशी हजार एकशे बेचाळीस फक्त) चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०० विषय क्रमांक - २७

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग- इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक - मा.अमिना पानसरे अनुमोदक - मा.वैशाली काळभोर

संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क.इ/स्था/कावि/०९/८४४/२०१६ दि.२२/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.३५ भोसरी स. नं.१ मध्ये आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र इमारत बांधणेकामी कामाचे निविदा पुर्व कामाकरिता आर्किटेक्चरल सर्व्हिसेस मे.मिलिंद किरदत्त, नियोजन कन्सल्टंट, पुणे हेच पुरवित आहेत. या बाबीचा विचार करता प्रकल्प यशस्वीपणे व तांत्रिकदृष्टया पुर्ण होणेकामी निविदा पश्चात कामासाठी मे. मिलिंद किरदत्त, नियोजन कन्सल्टंट, पुणे यांना प्रकल्प सल्लागार (PMC) म्हणून नेमून त्यांना प्रकल्प किंमतीच्या १.३५% या दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०१ विषय क्रमांक - २८

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडे निविदा नोटीस क्र.२/६५-२०१५-१६ अ.क्र.४३ अन्वये लांडेवाडी झोपडपट्टीतील अंतर्गत गल्ली बोळाचे कॉक्रीटीकरण करणे/पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे ठराव क्र. १५२१७ दि. १७/०२/२०१६ अन्वये मे. श्रीयश कन्स्ट्रक्शन (निविदा र.रू. ९,३३,६२०/-) पेक्षा ४% कमी या दराने ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ८,९६,२७५/- पर्यंत काम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत व्यक्तिगत घरगुती शौचालय बांधणे (IHHL) यासाठी धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करीता शासननिर्णय क्र. स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत कौटुंबिक व्यक्तिगत सौचालय नाही. त्यासाठी बांधणे व जलनिसा:रण नलिका उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

त्यामुळे संपुर्ण लांडेवाडीत व बालाजीनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालू आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे डांबरी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. सदर डांबरी रस्त्यावरील चर WBM व BBM करून resurfing करणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी ब्लॉक ऐवजी सर्वत्र कॉक्रीट पेव्हिंग करून सदरहू रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे आवश्यक ठिकाणी गटर्स व बंद पाईप गटर्स, चेंबर्स तथा इतर अनुषंगिक दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर झोपडपट्टीमधील रस्त्याच्या दुरूस्तीची व्याप्ती पाहता सदरचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी वाढीव खर्च र.रू. ३१,००,०००/- सह उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्यास एकुण ४१,००,०००/- इतका खर्च येत आहे. त्याप्रमाणे उपरोक्त कामे करणेस व त्याकामी येणा-या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रू. ४१,००,०००/- यांस मा.शहर सुधारणा समिती यांचेकडून सदस्य ठराव क्र. ६४ दि. २१/४/२०१६ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उपरोक्त कामाच्या निविदा मंजूर दराने र.रू. ३९,३६,०००/- इतक्या रक्कमेपर्यंत काम करणेस म्हणजेच र.रू. ३९,३६,०००-८,९६,२७५ = र.रू. ३०,३९,७२५ इतक्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे आणि त्याप्रमाणे निविदा मंजूर दराने करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०२ विषय क्रमांक - २९

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक - मा.अमिना पानसरे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडे निविदा नोटीस क्र. १/७७-२०१५-१६ अ.क्र.४५ अन्वये नागसेननगर झोपडपट्टीतील स्थापत्य कामाची देखभाल दुरूस्ती करणेकामी ठराव क्र.१३३३८ दि. १०/११/२०१५ अन्वये मे.व्यंकटेश्वरा कन्स्ट्रक्शन (निविदा र.रू.९,३३,३१५/-) पेक्षा ६% कमी या दराने ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ८,७७,३१६/- पर्यंत काम करणेस

मान्यता देण्यात आलेली आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत व्यक्तिगत घरगुती शौचालय बांधणे (IHHL) यासाठी धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करीता शासननिर्णय क्र. स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत कौटुंबिक व्यक्तिगत सौचालय नाही. त्यासाठी बांधणे व जलनिसा:रण नलिका उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

त्यामुळे संपुर्ण नागसेनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालू आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे तेथे ब्लॉक ऐवजी सर्वत्र कॉक्रीट पेव्हिंग करून सदरहू रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे आवश्यक ठिकाणी गटर्स व बंद पाईप गटर्स तथा इतर अनुषंगिक दुरूस्ती करणे आवश्यक आहे. नागसेननगर मधील रस्त्याच्या दुरूस्तीची व्याप्ती पाहता सदरचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी वाढीव खर्च र.रू. ३१,००,०००/- सह उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्यास एकुण ४१,००,०००/- इतका खर्च येत आहे. त्याप्रमाणे उपरोक्त कामे करणेस व त्याकामी येणा-या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रू. ४९,००,०००/- यांस मा.शहर सुधारणा समिती यांचेकडून सदस्य ठराव क्र.५३ दि.१६/२/२०१६ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उपरोक्त कामाच्या निविदा मंजूर दराने र.रू. ३८,५४,०००/- इतक्या रक्कमेपर्यंत काम करणेस म्हणजेच र.रू. ३८,५४,००० - ८,७७,३१६ = र.रू. २९,७६,६८४ इतक्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे आणि त्याप्रमाणे निविदा मंजूर दराने करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०३ विषय क्रमांक - ३०

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडे निविदा नोटीस क्र.२/६५-२०१५-१६ अ.क्र.४५ अन्वये महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधील गटाराची दुरूस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे ठराव क्र.१५२२६ दि.१७/२/२०१६ अन्वये मे.श्रीयश कन्स्ट्रक्शन (निविदा र.रू. ९,३०,९७०/-) पेक्षा ४% कमी या दराने ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ८,९३,७३१/- पर्यंत काम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत व्यक्तिगत घरगुती शौचालय बांधणे (IHHL) यासाठी धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करीता शासन निर्णय क्र. स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत कौटुंबिक व्यक्तिगत सौचालय नाही. त्यासाठी बांधणे व जलनिसा:रण नलिका उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

त्यामुळे संपुर्ण महात्मा फुलेनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालू आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे काही ठिकाणी ब्लॉक ऐवजी सर्वत्र कॉक्रीट पेव्हिंग करून सदरहू रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे आवश्यक ठिकाणी गटर्स व बंद पाईप गटर्स, चेंबर्स तथा इतर अनुषंगिक दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर झोपडपट्टीमधील रस्त्याच्या दुरूस्तीची व्याप्ती पाहता सदरचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी वाढीव खर्च र.रू. २५,००,०००/- सह उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्यास एकुण ३५,००,०००/- इतका खर्च येत आहे. त्याप्रमाणे उपरोक्त कामे करणेस व त्याकामी येणा-या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रू. ३५,००,०००/- यांस मा.शहर सुधारणा समिती यांचेकडून सदस्य ठराव क्र.६३ दि.२१/४/२०१६ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उपरोक्त कामाच्या निविदा मंजूर दराने र.रू. ३३,६०,०००/- इतक्या रक्कमेपर्यंत काम करणेस म्हणजेच र.रू. ३३,६०,००० - ८,९३,७३१ = र.रू. २४,६६,२६९ इतक्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे आणि त्याप्रमाणे निविदा मंजूर दराने करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०४ विषय क्रमांक - ३१

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडे निविदा नोटीस क्र.२/६५-२०१५-१६ अ.क्र.८ अन्वये शांतीनगर झोपडपट्टीमधील अंतर्गत गल्ली बोळाचे कॉक्रीटीकरण करणे पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे ठराव क्र.१५२२३ दि.१७/२/२०१६ अन्वये मे.श्रीयश कन्स्ट्रक्शन (निविदा र.रू. ९,३३,६२०/-) पेक्षा ४% कमी या दराने ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ८,९६,२७५/- पर्यंत काम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत व्यक्तिगत घरगुती शौचालय बांधणे (IHHL) यासाठी धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करीता शासन निर्णय क्र. स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत कौटुंबिक व्यक्तिगत सौचालय नाही. त्यासाठी बांधणे व जलनिसा:रण नलिका उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

त्यामुळे संपुर्ण शांतीनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालू आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे डांबरी रस्त्याची दुरव्यस्था झाली आहे. सदर डांबरी रस्त्यातील चर WBM व BBM करून resurfing करणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी ब्लॉक ऐवजी सर्वत्र कॉक्रीट पेव्हिंग करून सदरहू रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे आवश्यक ठिकाणी गटर्स व बंद पाईप गटर्स, चेंबर्स तथा इतर अनुषंगिक दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर झोपडपट्टीमधील रस्त्याच्या दुरूस्तीची व्याप्ती पाहता सदरचे

कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी वाढीव खर्च र.रू. १५,००,०००/- सह उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रू. २५,००,०००/- ( यापुर्वीची प्रशासकीय मान्य र.रू. १०,००,०००/- वाढीव र.रू. १५,००,०००/- एकुण २५,००,०००/- ) इतका खर्च येत आहे. त्याप्रमाणे उपरोक्त नमुद कामे करणेस व त्याकामी येणा-या सुधारीत अंदाजपत्रकीय र.रू. २५,००,०००/- यांस मा.शहर सुधारणा समिती यांचेकडून सदस्य ठराव क्र.६२ दि.२१/४/२०१६ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उपरोक्त कामाच्या निविदा मंजूर दराने र.रू. २४,००,०००/- इतक्या रक्कमेपर्यंत काम करणेस म्हणजेच र.रू. २४,००,००० - ८,९६,२७५ = र.रू. १५,०३,७२५/- इतक्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे आणि त्याप्रमाणे निविदा मंजूर दराने करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०५ विषय क्रमांक - ३२

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक - मा.अमिना पानसरे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र. १६०३२ दिनांक २०/४/२०१६ मधील “मे. माऊली एंटरप्रायजेस” हा मजकूर वगळण्यात येवून त्याऐवजी “मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी” हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०६ विषय क्रमांक - ३३

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक - मा.अमिना पानसरे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत मे. शशांक फडके आर्किटेक्ट यांनी शासकीय व खाजगी स्वरूपाची मोठ्या प्रमाणात उल्लेखनीय प्रकल्पाचे नियोजन करून पुर्णत्वास वास्तवास नेले आहे. त्यांच्या अनुभवाचा व या क्षेत्रातील त्यांच्या ज्ञानाचा म.न.पा.स नेहमीच फायदा झाला आहे. त्यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नियुक्ती करण्यात आली होती. त्यास मा.स्थायी समिती ठराव क्र. ७७८२ दि. २२/८/२०१४ रोजीचा ठराव अन्वये सन २०१४-१७ या कालावधीत करीता मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर नियुक्ती आर्किटेक्ट म्हणून करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे निविदा पश्चात कामाकरीता तसेच प्रकल्पाचे दैनंदिन व्यवस्थापन करणेकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व त्याकरिता पॅनेलच्या अटी व शर्ती नुसार करारनामा करून प्रकल्प खर्चाच्या रक्कमेच्या १.३५% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर कामाकरिता कोणतेही कर स्वतंत्रपणे देणेत येणार नाही. तसेच सदरचे निर्णय मान्य असलेस प्रभाग क्र. १७ मध्ये आकुर्डी डिस्ट्रिक्ट सेंटरचा भुखंड विकसीत करणेकरिता नियोजन

करणेकरिता आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करणे व निविदा पश्चात कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०७ विषय क्रमांक - ३४

दिनांक - २६/०४/२०१६

सुचक - मा.अमिना पानसरे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.अमिना पानसरे व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर वास्तुविशारद म्हणून मे.शशी प्रभू अँड असो. यांची नेमणूक करणेत आलेली आहे. मनपा मार्फत आकुर्डी आरक्षण क्र. २७१ अ येथे १०० खाटांचे सुसज्ज रूग्णालय बांधण्याचे नियोजित आहे. तथापि मे. शशी प्रभू अँड असो. यांचा मनपा प्रकल्प कामातील पुर्व अनुभव व कौशल्य लक्षात घेता आकुर्डी रूग्णालय बांधणेकामासाठी व वास्तुविशारद (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणे तसेच मे. शशी प्रभू अँड असो. यांना मनपा प्रचलित दराप्रमाणे निविदापुर्व व निविदा पश्चात कामासाठी वास्तुविशारद (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून पॅनलच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करून प्रकल्प किंमतीच्या २.००% + १.३५% या दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -१६१०८ विषय क्रमांक - ३५

दिनांक - २६/०४/२०१६ विभाग - क्रिडा

सुचक -मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.महापालिका यांचे जा.क्र. क्रिडा/७अ/कावि/२९६/२०१६ दि. २६/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड अमेच्युअर बॉडी बिल्डिंग असोशिएसन यांचे सहकार्याने दि. ३० एप्रिल व १ मे २०१६ या काळात डॉ. हेगडेवार क्रीडा संकुल मासुळकर कॉलनी पिंपरी-४११ ०१८ येथे माजी महापौर कै.भिकु वाघेरे पाटील ५६ वी महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे एकुण र.रू. २८,६५,५००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व सदरच्या खर्चातील स्थापत्य विषयक खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रू. ३,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रू. १,५०,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रू. २४,१५,५००/- क्रीडा

विभागाचे महापौर चषक विविध क्रिडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच वेळ अपुरा असल्याने स्पर्धानुषंगांने मेडल्स ट्रॉफीस सन्मान चिन्हे, फ्लेक्स, बॅनर थेट पध्दतीने खरेदी करणेस व प्रमाणपत्रे निमंत्रण पत्रिका इ. भांडार विभागाकडून करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९१८/२०१६
दिनांक - २८/०४/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.